पुढारी

# ४४६ विद्यार्थ्यांनी दिली शिवाजी विद्यापीठाची प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभाग तसेच संलग्नित महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा घेण्यात येत आहे. सोमवारी एम. एस. डब्ल्यू. (रूरल कम्युनिटी डेव्हलपमेंट) (वायसीएसआरडी), एम.बी.ए. (रूरल मॅनेजमेंट), एम.बी.ए. एक्झिक्युटिव्ह, डिस्टन्स मोड इ. अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा पार पडल्या. एकूण ५१० विद्यार्थ्यांपैकी ४४६ विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली. प्रवेश परीक्षेस उपस्थित राहण्याचे विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण ८७.४५ इतके आहे. प्रवेश परीक्षांचे नियोजन दि.१०, ११, १२ व १३ जून रोजी कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर व बेळगाव या जिल्ह्यातील एकूण १६ परीक्षा केंद्रांवर करण्यात आले होते.